गुन्हे शाखा, गु.अ.वि

दूरध्वनी :– +९१–८९७६९५२६३३

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग




**वरिष्ठ पोलीस निरीक्षक (प्रशासन), गु.प्र.शा. मुंबई**
यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट समोर,डॉ.दा.नौ. मार्ग,
मुंबई – ४००००१

ई.मेल:– srpi.cbadm@mahapolice.gov.in

जा.क्र.**९९६**/वपोनि/प्रशासन/गु.प्र.शा./२०२६ दिनांक **१३**/१०/२०२६

प्रति,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
वेबसेल,
पोलीस आयुक्त कार्यालया आवार, मुंबई.

विषय :- Best Detection (उत्कृष्ट गुन्हे शोध) व Best Conviction (उत्कृष्ट अपराधसिध्दी) of the Month **Aug 2026 and Sept 2026** वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत.

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेवतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

**माहे ऑगस्ट-२०२६व माहे सप्टेंबर २०२६** करीता **'' बेस्ट डिटेक्शन अर्थात (उत्कृष्ट गुन्हे शोध) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात (उत्कृष्ट अपराधसिध्दी)''** याकरीता खालील नमुद पोलीस ठाणे यांची निवड करण्यात आलेली आहे.

**अ) माहे ऑगस्ट- २०२६ गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न**

१) दादर पोलीस ठाणे, मुंबई. गु.र.क्र. ४७०/२०२६, कलम ३१९(२) ३(५) भा.न्या.सं.

**ब) माहे सप्टेंबर - २०२६ गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न**

२) कक्ष-५, गुन्हे शाखा, मुंबई . गु.र.क्र. १२१/२०२६ कलम ३१८(४), ६१, ४५, ३(५) भा.न्या.सं सह कलम ६६(ड) आय.टी ॲक्ट (मालाड पोलीस ठाणे गु.र.क्र.१४९६/२०२६)

**क) माहे ऑगस्ट - २०२६ सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी**

३) कक्ष १०, गुन्हे शाखा, मुंबई .वि.स्था.गु.र.क्र. २८/२०२४ कलम ८(क), २२(क), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ (ओशिवरा पोलीस ठाणे, वि.स्था.गु.र.क्र.३०९/२०२३).

**ड) माहे सप्टेंबर - २०२६ सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी**

४) डी.एन. नगर पोलीस ठाणे, मुंबई. गु.र.क्र.५२८/२०१६ कलम ३०२,२०१ भादंवि.

**कृ.मा.पहा.......**

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ) **माहे ऑगस्ट व माहे सप्टेंबर २०२६** बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

**सही/-**
( **सुशिलकुमार भोसले** )
प्रभारी पोलीस निरीक्षक (प्रशासन),
गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई

**मजकुर :-**

दिनांक ०८/१०/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **"Best Detection of the Month"** **माहे ऑगस्ट २०२६ व माहे सप्टेंबर २०२६** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणे/शाखा यांची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट २०२६ - ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०१ | **दादर पोलीस ठाणे.** मध्य परिमंडळ ०३, मुंबई. | **गु.र.क्र.** ४७०/२०२६, कलम ३१९(२), ३(५) भा.न्या.सं. |

**'' बतावणी करुन फसवणूक''**

नमुद गुन्हात एका इसमाने फि'ना आवाज दिला व मला ओळखले नाहीस का, मला तुझ्याबरोबर बोलायचे आहे असे म्हणून रस्ता क्रॉस करुन बोलण्यात गुंतवून त्यांना प्रभादेवी येथे घेउन गेले आणि त्यांना म्हणाले की, तुमच्या गळयात जी चैन आहे ती दाखवा. त्याप्रमाणे मला चैन करायची आहे. असे सांगून, त्यांच्या गळयातील चैन काढून खिशात टाकली तसेच त्यांचे पॉकेट बघायला मागितले व पाकिटातील १००० रु काढून सिध्दीविनायक मंदिराच्या दिशेने निघून गेले म्हणून गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| फिर्यादी नाव / वय | चंद्रशेखर नारायण पारकर वय ७८ वर्षे |
| फसवणुक मालमत्ता | सोन्याची चैन अं.७ ते ८ ग्रॅम वजनाची अंदाजे किंमत रु. ७५,०००/- |
| हस्तगत मालमत्ता | सोन्याची चैन अं.७ ते ८ ग्रॅम वजनाची अंदाजे किंमत रु. ७५,०००/- |
| आरोपी अटक नाव / वय | १) नरेश गुलाबकुमार जैस्वाल वय ४८<br>२) रमेश गुलाबकुमार जैस्वाल, वय ५० |
| **अटक दिनांक** | **दिनांक २०/०८/२०२६** |
| गुन्हा कोणी उघडकीस आणला नाव | सपोनि. वाघमारे व पथक |

**गुन्हा उघडकीस आणणेकरीता केलेली कामगिरी :-** सदर गुन्हाच्या तपास सपोनि राहुल वाघमारे यांनी केला असुन दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने घटनास्थळाच्या खाजगी व शासकीय सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करुन नमुद गुन्हयातील आरोपीत हे नरेश जैस्वाल व रमेश जैस्वाल असल्याचे गुप्त बातमीदारांच्या मार्फतीने निष्पन्न करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज व आरोपीतांच्या सीडीआरचे विश्लेषण करुन नमुद आरोपीतांना गणेश नगर, उरण,जि. रायगड येथून ताब्यात घेतले व त्यांना पोलीस ठाण्यास आणून गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्यांचा नमुद गुन्हयामध्ये सहभाग निष्पन्न झाल्याने १) नरेश गुलाबकुमार जैस्वाल वय ४८ वर्षे रा.ठी. बि.नं.१८, रुम नं. ९,म्हाडा वसाहत,वाशीनाका, चेंबुर, मुंबई व २) रमेश गुलाबकुमार जैस्वाल, वय ५० वर्षे, बि.नं.१८, रुम नं. ९,म्हाडा वसाहत,वाशीनाका, चेंबुर, मुंबई यांना दिनांक २०/०८/२६ रोजी अटक करण्यात आली. त्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाप्रमाणे अटकेची कारण व अटकेचा आधार या बाबी समजावून सांगण्यात आल्या.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने नमुद आरोपीतांकडे तपास केला असता अटक आरोपी रमेश जैस्वाल याने निवेदन पंचनाम्यांतर्गत गुन्हयात फसवणुक केलेली ७.५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हि हितेंद्र ठाकूर नामक व्यक्तीला विक्री करीता दिली असल्याचे नमुद केल्याने अटक आरोपी रमेश जैस्वाल याच्यासह पोलीस ठाण्यास दोन पंचांसह निवेदन पंचनामा करुन हितेंद्र ठाकूर याचा शोध घेण्याकरीता त्याच्या राहत्या घरी इंदिरा एकनाथ ठाकूर हाउस, भिकाजी दामाजी मार्ग, एच पी रिफायनरी, गव्हाणपाडा,चेंबूर, मुंबई - ४०००७५ या ठिकाणी गेलो असता तेथे हितेंद्र ठाकूर यांचे वडील विकास ठाकूर हे मिळून आले. त्यांच्याकडे हितेंद्र ठाकूर याच्याविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांचा मुलगा हितेंद्र ठाकूर यास आरसीएफ पोलीस ठाण्याचे मार्फतीने मुंबईतून तडीपार केलेले आहे. सदर गुन्हयातील अटक आरोपी रमेश जैस्वाल व नरेश जैस्वाल याने गुन्हयातील फसवणुक केलेली चैन हि हितेंद्र ठाकूर यास विक्री करीता दिल्याचे नमुद केल्याने त्यास पोलीस ठाणे येथील पाहिजे आरोपी म्हणून रजिस्टरमध्ये नोंद घेतलेली आहे.

**दादर पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | सहा.पोलीस निरीक्षक | राहुल रामदास वाघमारे | प्रशस्तीपत्रक |
| 2 | पो.ह. ९६०६६१ | अनिल रामचंद्र जाधव | प्रशस्तीपत्रक |
| 3 | पो.ह. ०५०३३५ | दत्ता अरूण मेटकरी | प्रशस्तीपत्रक |
| 4 | पो.शि. ११०९८१ | सुनिल लाला कोकणी | प्रशस्तीपत्रक |
| 5 | पो.शि. १३०३३३ | गणेश संपत माने | प्रशस्तीपत्रक |

## (ब) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर २०२६ - ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०२ | **कक्ष-९, गुन्हे शाखा** प्रकटीकरण ,मुंबई | **गु.र.क्र.**१२१/२०२६ कलम ३१८(४), ६१, ४५, ३(५) भा.न्या.सं सह कलम ६६(ड) आय.टी.ॲक्ट २०००. (मालाड पोलीस ठाणे गु.र.क्र.१४९६/२०२६) |

### ''ऑनलाइन सायबर फसवणुक''

नमुद गुन्हयातील आरोपींनी देशभरातील विविध राज्यांतील विविध व्यक्तींना आर्थिक आमिष दाखवून त्यांच्या नावावर विविध बॅंकांमध्ये बॅंक खाती उघडून घेतली तसेच विविध मोबाईल सेवा पुरवठादार कंपन्यांची SIM कार्ड खरेदी करून घेतली. सदर बॅंक खाती उघडल्यानंतर त्यांची पासबुक, ATM कार्ड, चेकबुक, SIM कार्ड तसेच संबंधित बॅंक खात्यांशी निगडित इतर साधनांचा प्रत्यक्ष ताबा व नियंत्रण स्वत:कडे घेतले. तसेच सदर SIM कार्डीचा वापर करून संबंधित बॅंक खात्यांशी निगडित मोबाईल बॅंकिंग सुविधा व इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर नियंत्रण मिळविले. त्यानंतर आरोपींनी आपसात संगनमत करून स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी फौजदारी पात्र कट रचून, सदर बॅंक खात्यांचे मोबाईल बॅंकिंग पासवर्ड व ATM पासवर्डचा वापर केला. सदर बॅंक खात्यांमार्फत देशभरातील विविध राज्यांतील विविध व्यक्तींची ऑनलाइन सायबर फसवणूक करून त्यांच्याकडून प्राप्त झालेली रक्कम स्वीकारली व ती इतर विविध बॅंक खात्यांमध्ये हस्तांतरित केली तसेच ATM द्वारे रोख स्वरुपात काढून घेतली. अशा प्रकारे आरोपींनी सदर बॅंक खाती व SIM कार्डीचा वापर करून ऑनलाइन सायबर फसवणुकीचे व्यवहार केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर प्रकरणी गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी नाव/वय | :- | गणेश रघुनाथ काळे, वय वर्षे, धंदा – नोकरी, (पोलीस हवालदार क्र. ०८०३६२), नेमणूक – गुन्हे शाखा कक्ष-९, कुर्ला, मुंबई शहर |
| चोरीस/फसवणुक मालमत्ता | :- | आज पावेतो तपासमध्ये विविध बॅंकाचे एकुन २३६ बॅंक खात्यांमधुन सुमारे ११० कोटी रुपयांची फसवणुक झाली असल्याचे दिसुन आले आहे.अधिक तपास चालु असुन रक्कम वाढण्याची शक्यता आहे. |
| हस्तगत मालमत्ता | :- | लॅपटॉप ११,सिमकार्ड १८६,पासबुक ९९,चेकबुक १४३,एटीएम १५१,मोबाईल फोन ८३,लॅपटॉप चार्जर,मोबाईल चार्जर,नोटबुक हस्तगत करण्यात आली आहे तसेच गुन्हयात वापरलेल्या बॅंक खात्यामधिल रक्कम गोठविणे प्रकिया चालु आहे |
| आरोपी अटक नाव/वय | :- | १) इस्लामुद्दीन सलिमुददीन शेख, वय ४४ वर्षे,<br>२) यासीर नसिरुदिन शेख वय २६ वर्षे,<br>३) शेख अब्दुल रज्जाक अब्दुल रौफ वय ४५ वर्षे,<br>४) तेजसकुमार हसमुखलाल डबघर, वय ३६ वर्षे,<br>५) पियुशभाई ईश्वरभाई चावडा, वय १९ वर्षे<br>६) जितेंद्रसिंग मोबताजी राजपुत, वय २७ वर्षे,<br>७) दलपतसिंग बमरसिंग राजपुत वय २८ वर्षे,<br>८) वनराजसिंग जयपालसिंग वाघेला, वय २१ वर्षे,<br>९) योगेशकुमार अरविंदभाई पटेल, वय २६ वर्षे,<br>१०) गौतम तेजाभाई माली उर्फ लुसीफर उर्फ गट्टु, वय २५ वर्षे,<br>११) राहुल भरतभाई पटेल,वय-३३ वर्षे |
| **अटक दिनांक** | :- | **आरोपीत क्र १ ते ०३ यांना दिनांक १०/०९/२०२६ रोजी तळोजा नवी मुंबई येथुन अटक करण्यात आली आहे.**<br>**आरोपी क्र ४ ते १० यांना दिनांक १४/०९/२०२६ रोजी गोवा येथुन अटक करण्यात आली आहे.**<br>**आरोपी क्रमांक ११ यास दिनांक १५/०९/२०२६ रोजी गुजरात येथुन अटक करण्यात आली आहे.** |
| गुन्हा कोणी उघडकीस आणला | | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती रोहिणी लक्ष्मण पोतदार व पथक |

**गुन्हा उघडकीस आणणेकरीता केलेली कामगिरी-**कक्ष ५ च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती रोहिणी पोतदार यांना मिळालेल्या गोपनिय बातमीच्या अनुषंगाने कक्षाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सचिन बाराते यांनी तांत्रीक तपास सुरू केला असता, नमूद गुन्ह्यातील आरोपींनी मुंबई शहर आयुक्तालय हद्दीतील विविध बँकांमध्ये खाती उघडली असून, आरोपी हे तळोजा, नवी मुंबई परिसरातून सदर रॅकेट चालवत असल्याचे निष्पन्न झाले.त्यानुसार सदर बँक खात्यांबाबत संबंधित बँकांना पत्रव्यवहार केला असता, सदर बँक खात्यांमध्ये केवळ २ ते ३ महिन्यांच्या कालावधीत मोठ्या रकमेचे आर्थिक व्यवहार झाल्याचे दिसून आले. सदर बँक खात्यांमध्ये झालेल्या व्यवहारांपैकी काही रकमा विविध सायबर गुन्ह्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित पोलीस प्राधिकरणाकडून धारण अथवा गोठविण्यात आल्याचे बँकांकडून प्राप्त माहितीतून निदर्शनास आले.त्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांना टिपणी अहवाल सादर करून गुन्हा दाखल करण्याची परवानगी प्राप्त करण्यात आली व त्यानुसार सदर गुन्हा नोंद करण्यात आला.गुन्हा नोंद केल्यानंतर आरोपींचा तळोजा, नवी मुंबई येथे शोध घेऊन ०३ आरोपींना अटक करण्यात आली. अटक आरोपींकडून विविध बँकांची ८८ पासबुक, विविध बँकांची १४३ चेकबुक, विविध बँकांची १०० एटीएम कार्ड, बँकेशी संबंधित इतर कागदपत्रे, विविध कंपन्यांचे २४ मोबाईल फोन, विविध कंपन्यांची १६७ सिमकार्ड तसेच ०२ लॅपटॉप असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.अटक आरोपींकडे कौशल्यपूर्ण पद्धतीने तपास केला असता, त्यांचे इतर साथीदार गोवा राज्यात असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार गोवा राज्यात जाऊन ०७ आरोपींना अटक करण्यात आली. सदर आरोपींकडून विविध बँकांची १२ पासबुक, विविध बँकांची ५१ एटीएम कार्डे, विविध कंपन्यांचे ५९ मोबाईल फोन, विविध कंपन्यांची १९ सिमकार्ड, ०९ लॅपटॉप, ०५ लॅपटॉप चार्जर, ०४ मोबाईल चार्जर तसेच ०५ नोटबुक ज्यामध्ये त्यांच्या बेकायदेशीर बँक खात्यांची व आर्थिक व्यवहारांची माहिती आढळून आली, असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.त्यानंतर सदर अटक आरोपींचा साथीदार आरोपी अहमदाबाद, गुजरात राज्य येथे असल्याची माहिती प्राप्त झाल्याने, त्यानुसार अहमदाबाद, गुजरात येथे जाऊन सदर आरोपीस अटक करण्यात आली.आजपर्यंत नमूद गुन्ह्यात एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे.आजपर्यंत करण्यात आलेल्या तपासामध्ये आरोपींनी एकूण २३३ बँक खात्यांचा वापर केल्याचे दिसून आले आहे.तसेच आजपर्यंत केलेल्या तपासामध्ये आरोपींनी एकूण २,८९८ मोबाईल सिमकार्डचा वापर केल्याचे दिसून आले आहे.आजपर्यंत केलेल्या तपासामध्ये नमूद गुन्ह्याच्या अनुषंगाने सुमारे १०३ कोटी रुपयांची ऑनलाइन सायबर फसवणूक झाल्याचे दिसून आले आहे. अधिक तपास चालु असुन रक्कम वाढण्याची शक्यता आहे.तसेच आजपर्यंत केलेल्या तपासामध्ये सदर बँक खात्यांवर देशभरातील विविध राज्यांमधून एकूण ७७ सायबर तक्रारी नोंद झाल्याचे दिसून आले आहे. अधिक तपास चालु असुन तक्रार संख्या वाढण्याची शक्यता आहे.वरील तपासादरम्यान उपलब्ध झालेल्या बँक व्यवहार, मोबाईल सिमकार्डे, जप्त इलेक्ट्रॉनिक साधने, सायबर तक्रारी व इतर कागदपत्रांच्या आधारे आरोपींच्या गुन्हेगारी कार्यपद्धतीबाबत पुढील तपास सुरू आहे.

**कक्ष ५ गुन्हे शाखा, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | रोहीणी लक्ष्मण पोतदार | प्रशस्तीपत्रक |
| 2 | सहा. पोलीस निरीक्षक | धनराज किसन चौधरी | प्रशस्तीपत्रक |
| 3 | सहा. पोलीस निरीक्षक | सचिन अर्जुन बाराते | प्रशस्तीपत्रक |
| 4 | पोलीस उप निरीक्षक | अजय जिन्नाप्पा पोवार | प्रशस्तीपत्रक |
| 5 | पो.ह. ०७०९२० | विजय गणपत लोहकरे | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :-**

दिनांक ०८/१०/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **"Best Conviction of the Month"** **माहे ऑगस्ट २०२६ व माहे सप्टेंबर २०२६** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणे/शाखा यांची निवड करण्यात आलेली आहे.

**(क) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑगस्ट २०२६ - ०१ गुन्हा**

| | | |
|---|---|---|
| ०१ | **कक्ष १०, गुन्हे शाखा** प्रकटीकरण-१ मुंबई | **वि.स्था.गु.र.क्र. २८/२०२४**, कलम ८( क ), २२(क), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ (ओशिवरा पोलीस ठाणे, वि.स्था. गु.र.क्र. ३०९/२०२३) |

**-: '' अंमली पदार्थ बाळगणे '' :-**

नमुद गुन्हातील आरोपीत नामे आकाश अनिल सिंग, वय २६ वर्षे, याने त्याचे ताब्यात ५५ ग्रॅम वजनाचा एम.डी. अं.कि. रु ११,००,०००/- व आरोपी नामे भवन हयात सिंग अधिकारी, वय ४० वर्षे, यांने त्याच्या ताब्यात १०५ ग्रॅम अं.कि. ३२,००,०००/- एकुण १६० ग्रॅम वजनाचा मेफोड्रॉन (एम.डी) एकुण किंमत ४३,००,०००/- हा अंमली पदार्थ वाहतुक , विक्री व व्यापार करण्याच्या उद्‌देशाने स्वंत:च्या कब्जात बेकायदेशिर रित्या बाळगला म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी नाव/वय | :- | चंद्रशेखर दिलीप डफळे वय ३५ वर्षे पो.अं.०९१५८० |
| **निकाल दिनांक** | :- | **३१/०८/२०२६** |
| अटक आरोपी नाव/वय | :- | १) आकाश अनिल सिंग, वय २६ वर्षे,<br>२) भवन हयातसिंग अधिकारी, वय ४० वर्षे |
| **अटक दिनांक** | :- | **२८/०३/२०२४** |
| शिक्षेचा तपशील | :- | **आरोपीस क्र. १ व २ यांस**<br>१) नारकोटिक ड्रग सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस ॲक्ट १९८५ च्या कलम २२(क) सह कलम ८(क) व भा.न्या.सं. कलम २३५ (२) अन्वये **१० वर्षे कठोर कारावास व १,००,००० रू.दंड व दंड न भरल्यास ०६ महिने साधी कैद**<br>२) १) नारकोटिक ड्रग सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस ॲक्ट १९८५ च्या कलम २९(क) सह कलम ८(क) व भा.न्या.सं. कलम २३५ (२) अन्वये **१० वर्षे कठोर कारावास व १,००,००० रू.दंड व दंड न भरल्यास ०६ महिने साधी कैद** ही शिक्षा सुनावली. |
| कोणी तपास करून दोषारोपपत्र सादर केले | :- | पो.नि. सुतार व पथक |

**आरोपीस दोषसिध्दी होणेकरीता केलेली कामगिरी** :- सदर गुन्हयाचा तपासी अधिकारी पो.नि. सुतार व सहा.तपास अधिकारी सपोनि. चौधरी व त्यांच्या अधिपत्याखालील तपास पथकाने अत्यंत काळजीपुर्वक, शास्त्रोक्त व प्रामाणीकपणे पुर्ण केला. तपासादरम्यान उपलब्ध पुरावे, केसपेपर, साक्षीदारांचे जबाब तसेच इतर महत्वाचे बांबीचे योग्यप्रकारे संकलन करून सदर प्रकरण मा.न्यायालयात दोषारोपपत्रांसह सादर करण्यात आले.

सदर प्रकरणी न्यायालयाची सुनावणी सुरू असताना तपासी अधिकारी पोनि.सुतार, सहा.तपासी अधिकरी सपोनि. चौधरी, पैरवी अधिकारी मसपोनि. यादव, सफौ. ३०६१२/शेख, मपोअं. ११२११०/खाडे यांनी प्रकरणातील उपलब्ध पुरावे व तपासांचे अनुषगांने आवश्यकती कार्यवाही करून मा. न्यायालयासमोर प्रकरणांची प्रमाणीकपणे बाजु मांडली. तपासादरम्यान केलेल्या परीश्रमामुळे व उपलब्ध पुराव्याचे योग्य सदारीकरणामुळे मा.न्यायालयाने गुन्हयातील आरोपीतांना १० वर्षाची सक्त मजुरी व १ लाख रूपये दंड अशी शिक्षा सुनावली.

## कक्ष १० गुन्हे शाखा, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | पोलीस निरीक्षक | विशाल सुभाष राजे | प्रशस्तीपत्रक |
| 2 | पोलीस निरीक्षक | मनोज रामचंद्र सुतार | प्रशस्तीपत्रक |
| 3 | सहा. पोलीस निरीक्षक | धनराज किसन चौधरी | प्रशस्तीपत्रक |
| 4 | सहा. पोलीस निरीक्षक | पुनम निलेश यादव | प्रशस्तीपत्रक |
| 5 | स.फौ. ३०६१२ | अहमद मुबारक शेख | प्रशस्तीपत्रक |
| 6 | म.पो.शि. ११२११० | दया चंद्रकांत खाडे | प्रशस्तीपत्रक |

## (ड) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर २०२६ - ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०२ | **डी.एन. नगर पोलीस ठाणे, मुंबई**<br>पश्चिम परिमंडळ २, मुंबई | **गु.र.क्र.** ५२८/१६ कलम ३०२, २०१ भा.द.वि. |

**“ खुन ”**

नमुद गुन्हयातील अटक आरोपीताने त्याची पत्नी नामे श्रीमती पार्वती लक्ष्मण धनगर, वय ३५ हिच्या चारियावर संशय कारणावरून तिचा गळा दाबून खून केला व गुन्हयाचा पुरावा नष्ट करण्यासाठी पार्वती हिचा मृतदेह वायरलेस कंपाऊंड, खुबचंदानी हॉस्पीटलचे नियोजीत इमारती जवळील झुडपात, अंधेरी येथे टाकून दिला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी नाव/वय | :- | श्री. शितल कुमार पाटील, हि/३६ वर्ष |
| **निकाल दिनांक** | :- | **०८/०९/२०२६** |
| अटक आरोपी नाव/वय | :- | लक्ष्मण लिंगप्पा धनगर उर्फ गोरला, वय ३८ वर्षे |
| अटक दिनांक | :- | ०६/०८/२०१६ |
| शिक्षेचा तपशील | :- | नमुद गुन्हयात दि. ०८/०९/२०२६ रोजी मा.अतिरिक्त सत्र न्यायाधिश,शहर दिवाणी व सत्र न्यायालय, बोरीवली (विभाग), दिंडोशी ,मुंबई कोर्ट क्र.१०, मुंबई यांनी आरोपीविरुध्द आरोप सिध्द झाल्याने त्यास<br>१) कलम ३०२ भा.द.वि. अन्वये आरोपीतास **आजन्म कारावास व १,००० रू.दंड व दंड न भरल्यास ०२ महिने साधी कैद**<br>२) कलम २०१ भा.द.वि. अन्वये आरोपीतास **०३ वर्षाचा सक्त कारावास व ५०० रू. दंड व दंड न भरल्यास ०१ महीना दिवस साधी कैद** ही शिक्षा सुनावली. |
| कोणी तपास करून दोषारोपपत्र सादर केले | :- | पोलीस निरीक्षक श्री. किशोर लक्ष्मण सावंत व पथक |

**आरोपीस दोषसिध्दी होणेकरीता केलेली कामगिरी** :- सदर गुन्ह्यात आरोपी विरुद्ध उपलब्ध पुरावे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब, पंचनामे, वैद्यकीय पुरावे तसेच इतर आवश्यक कागदपत्रे यांचा योग्य पद्धतीने तपास करण्यात आला.तपासादरम्यान तपासी अधिकाऱ्यांनी घटनास्थळी तात्काळ भेट देऊन घटनास्थळाचा पंचनामा केला. गुन्ह्यात वापरलेले हत्यार, रक्ताचे डाग लागलेले कपडे व इतर महत्त्वाचे पुरावे ताब्यात घेऊन जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेले पुरावे रासायनिक विश्लेषणासाठी पाठवून त्याबाबतचा अहवाल प्राप्त करण्यात आला. तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी व इतर संबंधित साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले.गुन्ह्याची दोषसिद्धी होण्यासाठी फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच, तपासी अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व इतर महत्त्वाच्या साक्षीदारांना मा. न्यायालयासमोर हजर करून त्यांची साक्ष प्रभावीपणे नोंदविण्यात आली. तसेच गुन्ह्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेले सर्व पुरावे व कागदपत्रे मा. न्यायालयात सादर करून सरकारी पक्षाची बाजू भक्कमपणे मांडण्यात आली.सदर प्रभावी व शास्त्रीय तपासाच्या आधारे मा. न्यायालयाने आरोपी लक्ष्मण लिंगप्पा धनगर, वय ३८ वर्षे यास कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये दोषसिद्ध ठरवून आजीवन कारावास व रु. १,०००/- दंड, दंड न भरल्यास २ महिने अतिरिक्त कारावास, तसेच कलम २०१ भा.दं.वि. अन्वये ३ महिने कारावास व रु. ५००/- दंड, दंड न भरल्यास १ महिना अतिरिक्त कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणात तपासी अधिकारी व संबंधित अधिकारीध्अंमलदार यांनी केलेला काटेकोर, शास्त्रीय व प्रभावी तपास, पुराव्यांचे योग्य संकलन व जतन, साक्षीदारांचे योग्य पद्धतीने जबाब नोंदविणे तसेच मा. न्यायालयीन कार्यवाहीमध्ये प्रभावी समन्वय यामुळे आरोपीस दोषसिद्धी होऊन कठोर शिक्षा मिळण्यास मदत झाली आहे..

**<u>डी.एन.नगर पोलीस ठाणे, मुंबई</u> तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पोलीस अधिकारी/अंमलदार नाव** | **बक्षिसाचा तपशिल** |
|---|---|---|---|
| 1 | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | सचिन राजाराम गवस | प्रशस्तीपत्रक |
| 2 | पोलीस निरीक्षक | शितल कुमार पाटील **(बांद्रा पो.ठा)** | प्रशस्तीपत्रक |
| 3 | पोलीस निरीक्षक | सचिन संभाजी खोंद्रे | प्रशस्तीपत्रक |
| 4 | स.फौ. ३०३७१ | मधुकर पांडुरंग आव्हाड | प्रशस्तीपत्रक |
| 5 | पो.ह. ०३१३९४ | प्रशांत श्रावण कोष्टी | प्रशस्तीपत्रक |

.......................................